# इंडिया फाउंडेशन फॉर द आर्ट्स (आयएफए)
# त्यांच्या आर्ट्स प्रोग्रॅम अंतर्गत असणाऱ्या
# निर्मिती (*Productions*)
# या प्रकल्पासाठी अर्ज मागवत आहे

## अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख: Friday, June 09, 2023

**आर्ट्स प्रॅक्टिस** कार्यक्रम असे प्रकल्प राबवू इच्छितो की जेणेकरून कलाकारांना त्यांच्या सध्याच्या कलानिर्मितीचा पल्ला नवीन दिशेला वाढवता येईल. प्रायोगिकतेचं मूलतत्व पायाभूत ठेऊन, इथे रूढींना आव्हान दिलं जाऊ शकेल, विषयांची, आकृतिबंधांची आणि माध्यमांची व्याप्ती वाढवली जाऊ शकेल, अवकाश, प्रेक्षक आणि समाज यांना खिळवून ठेवण्याचे नवीन मार्ग शोधता येतील.

**निर्मिती:**
कलाकार त्यांच्या कलाप्रवासात एका अशा टप्प्यावर येऊन पोचतात जिथे त्यांना चाकोरीबाहेरच्या संकल्पना राबवाव्याश्या वाटतात / त्यांच्या कलानिर्मितीच्या पद्धतींचा पुनर्विचार करावासा वाटतो किंवा कलानिर्मिती आणि कलासादरीकरण यांच्यात काहीतरी नवीन करावंसं वाटतं. अशा शोधाची परिणती अशा निर्मितीत होते की ज्यांत उत्सुकता आणि प्रायोगिकता यांचा संगम होतो.

अशा शोधातून होणाऱ्या निर्मितीसाठी, आर्ट्स प्रॅक्टिस कार्यक्रमांतर्गतच्या **निर्मिती** प्रकल्पासाठी, आम्ही प्रस्ताव मागवत आहोत. अशी निर्मिती ही, सादरीकरण, दृक्श्राव्य, डिजिटल, साहित्यविषयक किंवा यांतील कोणतेही प्रकार घेऊन एकत्रित कलानिर्मिती करणे अशा स्वरूपात असू शकते. यांत नाट्यनिर्मिती, नृत्य आणि सांगीतिक कार्यक्रम, स्थापत्य, प्रदर्शन, पुस्तक, मासिक आणि इतर प्रकाशन, चित्रपट अथवा चलचित्र सादरीकरण, खेळ, संवादमाध्यम (interfaces) किंवा डिजिटल आणि इतर प्रकारातील कलानिर्मिती करणे यांचा समावेश असू शकतो.

**प्रकल्पाचा कालखंड:** १८ महिन्यांपर्यंत

**अर्थसहाय्य (Budget):** जास्तीतजास्त रुपये ५,००,०००/-

**अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख:** Friday, June 09, 2023

**प्रस्ताव कोण पाठवू शकेल?**
या कार्यक्रमांतर्गत प्रस्ताव कोणत्याही प्रांतातील किंवा एकापेक्षा अधिक प्रांतात कार्यरत असणारे पाठवू शकतील. यामध्ये खालील लोकांचा समावेश असू शकतो:

- संगीत, ध्वनी, लेखन, नृत्य, चळवळ, नाट्य, बाहुल्यांचा खेळ, गोष्टी सांगणारे, जादूगार, सर्कस आणि इतर कलाप्रकारातील कलाकार
- चित्रपट (माहितीपट आणि कथेवर आधारित), ॲनिमेशन, छायाचित्रकार, प्रदर्शननिर्माते, नवमाध्यम हाताळणारे, कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence), यांत्रिकनिर्मिती (robotics), संवादात्मक कलाप्रकार, खेळ, चित्रकला, शिल्पकला, printmaking, कॉमिक्स आणि इतर दृश्यकला प्रकारातील कलाकार.
- संग्राहक (Curators), विशेषकरून जे संग्रहालयाच्याऐवजी इतरत्र बाहेर कार्यरत आहेत ते.
- साहित्याशी निगडीत कवि, कादंबरीकार, नाटककार
- निरनिराळ्या कलाप्रांतात एकत्रितपणे काम करणारे कलाकार

**प्रस्ताव पाठवायची पद्धत**

- प्रस्तावात पुढील बाबींचा समावेश असावा:
  - तुमचे सध्याचे कलाक्षेत्र, त्यांत कलाकार म्हणून तुम्हाला असणारे प्रश्न आणि तुम्हाला असणारे स्वारस्य.
  - तुम्हाला अपेक्षित असणाऱ्या निर्मितीचे तपशील आणि त्यांची कारणे.
  - तुमच्या निर्मितीचे तपशीलवार वेळापत्रक आणि खर्चाचे तपशील.
  - तुम्ही आधी केलेल्या कामाचे तपशील.
  - तुमचा पत्ता, ईमेल आणि फोन क्रमांकासह बायोडाटा

**निवड प्रक्रिया:**

निवडक प्रस्ताव एका बाह्य समितीद्वारे तपासली जातील आणि अर्जदारांना या समितीसमोर त्यांच्या प्रकल्पाच्या संकल्पना सादर कराव्या लागतील. निवड झालेल्या प्रकल्पांची यादी September 2023 मधे जाहीर करण्यात येईल. याबाबत आयएफएचा निर्णय अंतिम असेल.

**प्रस्ताव येथे पाठवा:**

तुमचे अंतिम प्रस्ताव इथे पाठवू शकता:

- तुम्ही तुमचा प्रस्ताव कोणत्याही भारतीय भाषेत किंवा इंग्लिशमधे लिहू शकता. आयएफए इंग्लिशव्यतिरिक्त भारतीय भाषांमधे लिहिल्या जाणाऱ्या प्रकल्पांना कायम प्रोत्साहित करते.
- तुम्हाला तुमच्या प्रकल्पाच्या संकल्पनांविषयी काही प्रश्न असतील किंवा काही चर्चा करायची असेल तर May 19, 2023 पूर्वी sumana@indiaifa.org इथे संपर्क साधा.
- तुमचा अंतिम प्रस्ताव, त्याला संलग्न कागदपत्रांसह, २५ MB पर्यंत आकार असलेल्या एकाच ईमेलद्वारे, Friday, June 09, 2023 पूर्वी, sumana@indiaifa.org इथे पाठवा.
- ईमेलचा विषय: Project Proposal for Productions (Arts Practice) असा राहील.

  ***कृपया दखल घ्या की पात्रता निकषांत न बसणाऱ्या अर्जदाराचे प्रस्ताव आणि अपूर्ण प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.***

सर्व निवडलेले प्रकल्प आयएफएद्वारे चालविण्यात येतील.

***आर्ट्स प्रॅक्टिस कार्यक्रम हा सोनी पिक्चर्स एंटरटेनमेंट फंडातून चालविला जात आहे.***

## पात्रता निकष

इंडिया फाउंडेशन फॉर द आर्ट्स (IFA) आपल्या विविध कार्यक्रमांतर्गत खालील प्रकल्प राबवते. या कार्यक्रमांतर्गत अर्ज करण्याच्या पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे आहेत:

- केवळ भारतीय नागरिकचं अर्ज करू शकतात. यामध्ये पीआयओ (पर्सन्स ऑफ इंडियन ओरिजिन / भारतीय वंशाची व्यक्ती) आणि ओसीआय (ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया / भारताचे परदेशी नागरिक) कार्डधारकांचा समावेश नाही.

- अर्जदारांकडे ओळख आणि नागरिकत्वाच्या पुराव्यासाठी पॅन कार्ड आणि खालीलपैकी कोणतेही एक असणे आवश्यक आहे – भारतीय पासपोर्ट किंवा आधार कार्ड किंवा भारतातील मतदार ओळखपत्र.

- केवळ व्यक्ती अर्ज करू शकतात. कोणत्याही प्रकारच्या संस्था अर्ज करू शकत नाहीत

- जर प्रकल्पांमध्ये सहयोगी असतील, तर ते केवळ भारतीय नागरिक असले पाहिजेत

- ज्या व्यक्तींचा IFA सह आर्थिक अपराधाचा पूर्व इतिहास आहे ते यासाठी पात्र नाहीत

- ज्या व्यक्ती IFA मध्ये जमा करण्यात अयशस्वी ठरल्या आहेत त्यांनी आधीच्या IFA अनुदानातून डिलिव्हरेबल मान्य केले आहेत ते यासाठी पात्र नाहीत

- ज्या व्यक्तींना याआधी IFA कडून कोणत्याही कारणास्तव भविष्यात अर्ज करण्यास प्रतिबंधित करणारे पत्र प्राप्त झाले असेल तर ते यासाठी पात्र नाहीत

- जर संयुक्त खाते असेल तर एकापेक्षा जास्त व्यक्ती अर्ज करू शकतात. जर त्यांनी तसे केले नाही, तर त्यांच्यापैकी फक्त एकाने इतरांसह सहयोगी म्हणून अर्ज करावा.